## प्रेस नोट दि.११/११/२०१७

## (बेकायदेशिर अग्नीशस्त्र बाळगणा-यास गुन्हे शाखेचे गुंडा स्कॉड दक्षिण विभागाने केले अटक )

पुणे शहर गुन्हेशाखे कडील संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक दक्षिण विभागा मध्ये कार्यरत असणारे पोनिरी श्री.राम राजमाने व त्यांचा स्टाफ हे दि.१०/११/२०१७ रोजी कोथरुड पोलीस स्टेशनचे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग फिरत असताना फिरत फिरत असताना स्कॉड मधील पोलीस कर्मचारी गणेश साळुंके यांना त्यांचे बातमीदारा कडुन बातमी मिळाली कि, चारनळ चौका जवळ एक इसम त्याचे कमरेला गावठी पिस्टल घेवुन थांबला आहे त्याने अंगात गुलाबी रंगाचा शर्ट व फिक्कट राखाडी रंगाची जीन्स घातली आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाली. सदरचे बातमीप्रमाणे खात्री करता बातमीप्रमाणे वर्णनाचा इसम मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेऊन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव प्रमोद बाळासाहेब गायकवाड वय-२६ वर्षे, धंदा-खानावळ, रा.पुर्नवसन जागेत, प्लॉट नं.३३, तलाठी ऑफिस समोर, सोमाटणे फाटा, ता.मावळ, जि.पुणे असे सांगीतले. त्याचेकडे डावे कमरेला जीन्स पॅन्टमध्ये खवलेले गावठी पिस्टल मिळाले. देशी बनावटीचे गावठी पिस्टल चेक करता त्याचे मॅगजिन मध्ये दोन जिवंत काडतुसे मिळाले. असा एकुण मिळुन २५,५००/- चा मुद्देमाल गुन्हयाचे अनुषंगाने जप्त करण्यात आला आहे. त्याचे विरुध्द गणेश साळुकें यांनी कोथरुड पो.ठाणे गु.र.न.४३१/२०१७ आर्म अॅक्ट कलम ३ (२५) व मुंबई पोलीस अॅक्ट कलम ३७ (१), सह १३५ प्रमाणे फिर्याद दिली आहे. गुन्हा दाखल करणेत आला असुन तपासकामी त्याची मा.न्यायालयातुन पोलीस कस्टडीची रिमांड घेणेत आली आहे. **गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस फौजदार आर.एस.कदम हे करित आहेत.**

**सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे श्री.प्रदिप देशपांडे सो-अपर पोलीस आयुक्त, गुन्हे., श्री.पंकज डहाणे सो,पोलीस उप आयुक्त,गुन्हे.श्री.समीर शेख सो-सपोआ,गुन्हे-१, यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड दक्षिण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने, सहा.पो.फौज.राजेंद्रसिंग चौहान. रविंद्र कदम, गणेश साळुकें, सुनिल चिखले, प्रशांत पवार, प्रविण तापकीर, संजय बरकडे, विवेक जाधव, अजय उत्तेकर, किरण ठवरे, प्रविण पडवळ,राकेश खुणवे,नितीन रावळ,रमेश चौधर, चालक-गंगावणे यांनी केली आहे.**